महाराष्ट्र शासन

**विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर**

(लेखा शाखा)

**ई-मेल:-** dcg.aurangabad@gmail.com **दूरध्वनी क्र** 0240-2351311

---

# जाहीर सुचना (मुदतवाढ १ ली वेळ)

जा.क्र २०२५/साप्र/लेखा-४/ पाणी जार /प्र.क. दिनांक :१७/०४/२०२५.

**विषय :_विभागीय आयुक्त कार्यालयात फिल्टर पिण्याचे पाणी जार पुरवठा करणेकरीता दरपत्रके मागविणे बाबत.**

विभागीय आयुक्त कार्यालयातील प्रशासकीय इमारतीतील पहिला, दुसरा व तिसरा मजला येथे अभ्यांगतासाठी पिण्याच्या पाण्याचे Water Dispenser वर ठेवण्यासाठी शुध्द (Filter) पाण्याचे जार पुरवठा करणे आवश्यक आहे.

खालील विवरणपत्रात दर्शविण्यात आलेल्या कामाच्या अनुषंगाने सेवापुरवठादार यांचेकडून दिनांक ९/०४/२०२५ ते १५/०४/२०२५ या कालावधीत दरपत्रके मागविण्यात आली होती. तथापि सदर कालावधीत एकही दरपत्रक प्राप्त झालेले नाही, करीता त्याच अटी व शर्तीचा समावेश करुन दरपत्रक मागविण्याच्या कालावधीत एक आठवडयाची मुदत वाढ देण्यात येत आहेत.

| अ,क्र | बाब | दरदिवशी /दरमहिना /वार्षिक अंदाजे आवश्यक नग | प्रति नग दर (रुपयात) |
|---|---|---|---|
| १. | शुध्द (Filter) पाणी जार | १०/२००/२४०० | |

- **खालील कागदपत्रे असणे आवश्यक आहे.**

१ दरपत्रकधारकाची / निविदाधारकाची माहितीबाबतचे विवरण पत्र सोबत संलग्न केले आहे.

२ दुकाने व संस्था अधिनियम 1947 अन्वये शॉप ॲक्ट लाइसन्स / संस्थेचे /आस्थापना /नोंदणी प्रमाणपत्राची अद्यावत प्रमाणपत्राची छायांकित प्रत.

३ आधार कार्डची छायांकित प्रत.

४ पॅन कार्डची छायांकित प्रत

५ GST वस्तू व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्राची (Certificate of Registration) छायांकित प्रत

६ सादर केलेल्या कागदपत्रांच्या सत्यतेबाबत व काळ्या यादीत समाविष्ट नसल्याबाबतचे निविदा / दरपत्रकातील अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र/हमीपत्र, सोबत संलग्न केले आहे

उपरोक्त अनुक्रमांक १ ते ०६ ही सर्व कागदपत्रे स्वयंसाक्षांकित ( self attested ) करुन तांत्रिक लिफाफा मध्ये सादर करणे बंधनकारक आहे. तसेच सर्व परवान्यांचे दरपत्रकाच्या कालावधीपर्यंत नुतनीकरण असणे आवश्यक राहील. वरीलपैकी सर्व कागदपत्राच्या मुळ प्रती दरपत्रक उघडतेवेळी, सोबत ठेवणे व कोणत्याही कागदपत्राच्या मुळ प्रतीची मागणी या कार्यालयाकडून कोणत्याही वेळी करण्यात आल्यास, त्या सादर करणे बंधनकारक राहील.

## १. निविदा / दरपत्रकाबाबत आवश्यक अटी व शर्ती

१. एक निविदाधारक /दरपत्रकधारक यांनी एकच निविदा/दरपत्रक भरणे आवश्यक असून त्यांना एकापेक्षा अधिक निविदा/दरपत्रके एका नावाने किंवा वेगवेगळया नावांने सादर करण्यास प्रतिबंध आहे .

२. विहीत मुदतीनंतर प्राप्त निविदा / दरपत्रके स्विकारली जाणार नाही अथवा त्यावर विचार केला जाणार नाही.

३. पिण्याचे पाणी जार बाबत शुध्द करुन कसे पुरवठा करणार या बाबत सेवापुरवठादार यांनी विवरण नमुद करावे.

४. निविदा / दरपत्रकाचा तांत्रिक लिफाफा सुरवातीस उघडण्यात येईल. तपासणीअंती लिफाफ्यात आवश्यक असणा-या नमुद कागदपत्रांची पुर्तता करण्या-या, पात्र निविदाधारकांची पुढील निविदा प्रक्रियेसाठी विचार करण्यात येईल. व लिफाफ्यात पात्र दरपत्रधारकांचाच कमीत कमी एल-१ दराचा विचार करण्यात येईल.

५. या अटी व शर्ती मध्ये नवीन अटी व शर्तीचा समावेश करणे, अटी व शर्ती कमी करणे, तसेच परिस्थितीनुसार त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार विभागीय आयुक्त कार्यालयाने राखुन ठेवले आहेत.

६. कोणतेही दरपत्रक/निविदा, प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर नाकारण्याचा व रद्द करण्याचा अधिकार या कार्यालयाने राखुन ठेवला आहे.

७. ज्या दरपत्रकधारकाचा दर अंतिम झाल्यानंतर, त्यांना सोबतच्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा करारनामा रु.५००/- च्या बॉंडवर आदेशाच्या दिनांकापासुन १५ दिवसाच्या आत सादर करणे आवश्यक राहील.

८. सदर निविदेचा कालावधी एक वर्षाचा राहील. तथापि आवश्यकता असल्यास मुदतवाढ देण्यात येईल.

९. निविदा/ दरपत्रकधारकाची माहितीबाबतचा नमुना सोबत संलग्न केला आहे

आपल्याकडील दरपत्रके वरील कागदपत्रासह या कार्यालयास दिनांक-१७/०४/२०२५ ते २८/०४/२०२५ रोजी सायंकाळी ६.०० वा पर्यंत या कार्यालयाचे लेखाशाखेमध्ये सादर करावेत. उशिरा प्राप्त झालेल्या किंवा अपूर्ण दरपत्रके यांचा विचार करण्यात येणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी विहीत दिनांकास व विहीत वेळेपर्यंत प्राप्त झालेली दरपत्रके दिनांक-२९/०४/२०२५ रोजी दुपारी ३.०० वा अपर आयुक्त (साप्र) विभागीय आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांचे कक्षामध्ये सर्व उपस्थितांसमक्ष उघडण्यात येतील.

**(मा. अपर आयुक्त (साप्र) यांच्या टिपणी मान्यतेने)**

(अरुण पावडे)
**प्र.तहसीलदार (सा.प्र)**
**विभागीय आयुक्त कार्यालय,**
**छत्रपती संभाजीनगर, विभाग.**